सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

माजी सैनिक वसाहती जवळ, एम.आय.डी.सी.एरिया, विद्यानगर, मिरज-४१६ ४१०.
दुरध्वनी क्रमांक - कार्यालय (०२३३) २२३१४२३ कार्यालय (०२३३) २२३१२६९
(Email : gpmiraj@gmail.com) (Website : www.gpmiraj.ac.in)

जा.क्र.शातंमि/आस्था-१/MIS माहिती/२०२४/८४४ दिनांक :- 12 MAR 2024

**महत्वाचे परिपत्रक :-**

**विषय : MIS बाबतची अधिका-यांची माहिती सादर करणे बाबत.**

संदर्भ :- मा.संचालक, म.रा. मुंबई यांचे दि.०७.०३.२०२४ रोजीचे परिपत्रक.

मा.संचालक, म.रा. मुंबई यांनी संदर्भिय परिपत्रकान्वये MIS ची माहिती सादर करणेबाबत कळविले आहे. त्याअनुषंगाने संस्थेतील सर्व विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, MIS (व्यवस्थापन माहिती प्रणाली) बाबतची माहिती भरणेकरीता विहित नमुन्यातील फॉर्म संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केले असुन, आपले अधिपत्याखालील सर्व अधिकारी यांचेकडून सदरची वैयक्तिक माहिती संदर्भिय परिपत्रकामध्ये नमुद केलेल्या सुचनांचे अवलोकन करुन अचूकरीत्या भरुन त्याबाबतची प्रिंट कागदाच्या दोन्ही बाजूस घेऊन प्रत्येक पानावर संबंधित अधिका-याची स्वाक्षरी घेऊन हार्डकॉपी आस्थापना विभागास व सॉफटकॉपी gpmiraj@gmail.com या मेल आयडीवर मेल करावी. अध्यापकांची माहिती प्रणालीमध्ये सादर (Submit) केल्यानंतर संबंधित अध्यापकांना DTE मार्फतच्या प्रणालीद्वारे SMS द्वारे Login credential पाठविण्यात येईल. सदरची ऑनलाईन भरलेली माहिती संबंधित अधिका-यांनी SMS द्वारे प्राप्त Login credential द्वारे Login करुन माहितीची तपासणी करावी. प्रणालीमध्ये भरलेल्या माहितीमध्ये काही त्रुटी असल्यास त्याबाबत तात्काळ कार्यालयास अवगत करावे. तसेच भरलेली माहिती अचूक असल्यास संबंधित अधिका-यांनी माहिती अचूक असल्याबाबत पोर्टलवर सत्यापित (Verified) करुन निश्चित करावी. तसेच संबंधित विभागातील सर्व अधिका-यांची एकत्रित माहिती दि.१६.०३.२०२४ पर्यंत कार्यालयास सादर करणेबाबत दक्षता घेण्यात यावी.

(कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

सोबत :- संदर्भिय परिपत्रकाची छायांकित प्रत व MIS चा विहित नमुन्यातील फॉर्मची सॉफटकॉपी (संकेतस्थळावर)

प्रति - सर्व विभागप्रमुख / कर्मशाळा अधिक्षक / प्रबंधक यांना पुढील कार्यवाहीसाठी.

| | | | |
|---|---|---|---|
| १. स्थापत्य विभाग | २. यंत्र विभाग | ३. संगणक विभाग | ४. पॉलिमर टेक्नॉलॉजी |
| ५. वैद्यकीय अणुविद्युत | ६. उपयोजित यंत्रशास्त्र | ७. विज्ञान व मानव्यशास्त्र | ८. विद्युत विभाग |
| ९. कर्मशाळा विभाग | १०. ग्रंथालय विभाग | ११. वसतिगृह विभाग | १२. कार्यालय विभाग |

प्रत :- श्री. सतिश प्र. काळे, प्रोग्रामर यांनी उपरोक्त परिपत्रक व सोबतचे कागदपत्रे संस्थेच्या संकेतस्थळावर तात्काळ उपलब्ध करावे.